पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - ८**

सभावृत्तांत

दिनांक - १९/११/२०१४ वेळ - दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **१९/११/२०१४** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) **मा. छाया जगन्नाथ साबळे - सभापती**
२) मा. आर.एस.कुमार
३) मा. उल्हास शेट्टी
४) मा. नेटके सुमन राजेंद्र
५) मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
६) मा. लोखंडे गोरक्ष जाकाराम
७) मा. आसवाणी सविता धनराज
८) मा. अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तुमराम - प्रशासन अधिकारी, मा.तुपसाखरे - उप अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.६ - आरक्षण बदलणेबाबत - मा.आशा सुर्यवंशी, मा.उल्हास शेट्टी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७ - आरक्षणातील क्षेत्र निवासी विभागात समाविष्ठ करणेबाबत - मा.आशा सुर्यवंशी, मा.उल्हास शेट्टी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८ - आरक्षणाचे भूसंपादन करणेबाबत - मा.उल्हास शेट्टी, मा.आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक - मा.आशा सुर्यवंशी                    अनुमोदक - मा.अश्विनी चिंचवडे

मा.शहर सुधारणा समितीची दिनांक १९/११/२०१४ ची सभा बुधवार दिनांक ०३/१२/२०१४ रोजी दुपारी २.४५ पर्यंत तहकुब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

सभापती - बुधवार दिनांक ०३/१२/२०१४ रोजी दुपारी २.४५ पर्यंत तहकुब करणेत येत आहे.

( **छाया जगन्नाथ साबळे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - ८**

सभावृत्तांत

( दिनांक १९/११/२०१४ ची तहकूब सभा )

दिनांक - ०३/१२/२०१४ वेळ - दुपारी २.४५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची दिनांक १९/११/२०१४ ची तहकूब सभा बुधवार दिनांक **०३/१२/२०१४** रोजी दुपारी **२.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) **मा. छाया जगन्नाथ साबळे - सभापती**
२) मा. आर.एस.कुमार
३) मा. उल्हास शेट्टी
४) मा. नेटके सुमन राजेंद्र
५) मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
६) मा. लोखंडे गोरक्ष जाकाराम
७) मा. जवळकर वैशाली राहुल
८) मा. अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.दंडवते - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.गट्टुवार - कार्यकारी अभियंता, मा.ऐवले - समाज विकास अधिकारी, मा.शिंपी - नगररचनाकार, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक - मा.उल्हास शेट्टी अनुमोदक - मा.आशा सुर्यवंशी

बॅ.ए.आर.अंतुले - माजी मुख्यमंत्री, देवेन वर्मा - जेष्ठ अभिनेते, अंबादास कांबळे - पत्रकार सौ.आशाताई बाबासाहेब धुमाळ - नगरसेवक बाबासाहेब धुमाळ यांच्या पत्नी यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून बुधवार दिनांक १०/१२/२०१४ रोजी दुपारी ३.१५ पर्यंत सभा तहकूब करावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**(**सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजली अर्पण केली**)**

**सभापती -** बुधवार दिनांक १०/१२/२०१४ रोजी दुपारी ३.१५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **छाया जगन्नाथ साबळे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - ८**

सभावृत्तांत

( दिनांक १९/११/२०१४ व ०३/१२/२०१४ ची तहकूब सभा )

दिनांक - १०/१२/२०१४ वेळ - दुपारी ३.१५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची दिनांक ०३/१२/२०१४ ची तहकूब सभा बुधवार दिनांक **१०/१२/२०१४** रोजी दुपारी **३.१५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) **मा. छाया जगन्नाथ साबळे - सभापती**
२) मा. आर.एस.कुमार
३) मा. नेटके सुमन राजेंद्र
४) मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
५) मा. आसवाणी सविता धनराज
६) मा. अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.गावडे - सह.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.गट्टुवार - कार्यकारी अभियंता, मा.चौरे, मा.पुजारी, मा.तुपसाखरे, मा.वाघ - उप अभियंता, मा.बहाद्दरपुरे - सहा.समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**अ)** दिनांक १७/०९/२०१४, ०१/२०/२०१४, १७/१०/२०१४ व ०५/११/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक ५ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**ब)** दिनांक ०१/१०/२०१४, १७/१०/२०१४ व ०५/११/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक ६ )** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**क)** दिनांक ०५/११/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक ७ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - २७ | विषय क्रमांक - १

दिनांक - १०/१२/२०१४ | विभाग - नगररचना व विकास

सुचक - मा.आर.एस.कुमार | अनुमोदक - मा.आशा सुर्यवंशी

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/९/२९१/२०१४, दि.३०/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मौजे पिंपळे निलख येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील स.नं.६५ पै. ते ६७ पै. १८.०० मी. रुंद रस्त्याचे आखणीमध्ये बदल करुन रस्त्यांची रुंदी २४.०० मी. करणेबाबत म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबतची कार्यवाही चालू आहे. सदर प्रस्तावास मा.महापालिका सभेने ठराव क्र.३०० दि.२७/०६/२०१३ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. सदर ठरावानुसार फेरबदल दर्शविणारा नकाशा उपसंचालक, नगररचना व विकास विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे कार्यालयात ठेवणेत आला होता. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आला होता. तसेच सदर फेरबदलाची जाहिर नोटीस दि.२१/११/२०१३ च्या दै.लोकमत या मराठी माध्यमाच्या वर्तमानपत्रात व दै.टाईम्स ऑफ इंडिया या इंग्रजी माध्यमाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेत आली होती. महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दि.०४/१२/२०१३ नुसार जाहिर नोटीस प्रसिध्द करणेत आली होती. सदर जाहिर नोटीशीच्या अनुषंगाने प्रस्तावित फेरबदलाबाबत नागरिकांच्या ३२ हरकती या विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. सदरच्या प्राप्त हरकतधारकांना दि.२१/०४/२०१४ रोजी सुनावणी देण्यात आली आहे. सुनावणीच्या वेळेस हरकतधारकांनी नमुद केलेले मुद्दे व हरकती यांचा विचार करुन मनपाचा अभिप्राय त्या बाबतचा अहवाल प्रस्तावासोबतच्या तक्त्यात नमुद केलेला आहे. सदर फेरबदलाचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास मंजूरीसाठी सादर करणेस मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २८ | विषय क्रमांक - २

दिनांक - १०/१२/२०१४ | विभाग - जलनि:सारण ब क्षेत्रीय

सुचक - मा.आशा सुर्यवंशी | अनुमोदक - मा.अश्विनी चिंचवडे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.जनि/कावि/T.B.drainage/६८/२०१४, दि.१०/१०/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्र.५२ मधील काळाखडक, वाकड झोपडपट्टीमध्ये जलनि:सारण नलिका टाकणेकामी येणा-या र.रु.४७,००,०००/- (अक्षरी र.रु.सत्तेचाळीस लाख फक्त) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - २९ | विषय क्रमांक - ३
दिनांक - १०/१२/२०१४ | विभाग - जलनि:सारण ब क्षेत्रीय
सुचक - मा.अश्विनी चिंचवडे | अनुमोदक - मा.आर.एस.कुमार

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.जनि/कावि/T.B.drainage/६६/२०१४, दि.१०/१०/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्र.५२ वाकड मधील आण्णाभाऊ साठेनगर झोपडपट्टीमध्ये जलनि:सारण नलिका टाकणेकामी येणा-या र.रु.२१,५०,०००/- (अक्षरी र.रु.एकवीस लाख पन्नास हजार फक्त) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे..

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३० | विषय क्रमांक - ४
दिनांक - १०/१२/२०१४ | विभाग - पाणीपुरवठा जलनि:सारण
सुचक - मा.आर.एस.कुमार | अनुमोदक - मा.आशा सुर्यवंशी

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पापु/जनि/क प्रभाग/८९/२०१४, दि.१७/१०/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.३७ मधील बालाजीनगर झोपडपट्टीत ड्रेनेजची मुख्यगुरुत्व नलिका टाकणे कामी येणा-या र.रु.२५,००,०००/- (अक्षरी र.रु.पंचवीस लाख फक्त) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१ | विषय क्रमांक - ५
दिनांक - १०/१२/२०१४ | विभाग - जलनि:सारण अ क्षेत्रीय
सुचक - मा.आशा सुर्यवंशी | अनुमोदक - मा.अश्विनी चिंचवडे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.जनि/कावि/अ४/३१/२०१४, दि.११/११/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

चिंचवड मैलाशुध्दी प्रकल्पा अंतर्गत प्रभाग क्र.८ मध्ये विद्यानगर, रामनगर, दत्तनगर, व परिसरात आवश्यकतेनुसार भुयारी गटर नलिका टाकणे तसेच इतर जलनि:सारण विषयक आवश्यक सुधारणा कामे करणेकामी येणा-या र.रु.५०,००,०००/- (अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ३२ विषय क्रमांक - ६

दिनांक - १०/१२/२०१४

सुचक - मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.सुमन नेटके

संदर्भ : मा.आशा सुर्यवंशी, मा.उल्हास शेट्टी यांचा प्रस्ताव -

मौजे पिंपरी वाघेरे स.नं.३११ (मौ), ३१२ (मौ), ३१३ (मौ), ३१४ (मौ), येथील सुधारित मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक १७४ प्राथमिक शाळेच्या जागेवर नाटयगृहासाठी जागा आरक्षित करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३३ विषय क्रमांक - ७

दिनांक - १०/१२/२०१४

सुचक - मा.आर.एस.कुमार अनुमोदक - मा.सुमन नेटके

संदर्भ : मा.आशा सुर्यवंशी, मा.उल्हास शेट्टी यांचा प्रस्ताव -

विषय - पिंपरी काळेवाडी (पवनानगर) परिसरामधील स.नं.८८, ९०, ९१, ९५ व ९६ या स.नं. आ.क्र.६३९ (उद्यान) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करुन आरक्षणातील क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट करणे.

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३४ विषय क्रमांक - ८

दिनांक - १०/१२/२०१४

सुचक - मा.आर.एस.कुमार अनुमोदक - मा.आशा सुर्यवंशी

संदर्भ : मा.उल्हास शेट्टी, मा.आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव -

मौजे आकुर्डी येथील स.नं.१६/१,२ पैकी सि.स.नं.४१३८/१ ते १४, ४१३९, ४१३९/१ ते ३ मिळकती पैकी १६०० चौ.मी.क्षेत्र आ.क्र.२५८, उद्यान या प्रयोजनासाठी आरक्षित असून काही भाग १२ मी. रस्तारुंदीने बाधित आहे व काही भाग दोन नियोजित १२ मी. रस्त्याने बाधीत होत असून उर्वरित भाग निवासी विभागात समाविष्ट आहे. सदर भागात नागरिकांसाठी उद्यान नसल्याने उपरोक्त आरक्षण व त्यासाठी आवश्यक असलेला रस्ता भूसंपादनाने ताब्यात घेणेस,

तसेच भूसंपादन मुळ विकास नकाशानुसार करणेस व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( छाया जगन्नाथ साबळे )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/९९४/२०१४
दिनांक : ११/१२/२०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Shahar Sudharana-14-15\proceeding 8_Shahar Sudharna.doc